दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (वाहन)
यांचे कार्यालय, मिरा भाईदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/९४/२०१८
दि.२०/०७/२०१८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (वाहन), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.अशोक कुमार निगम,
ए/१०४, कृष्णलीला ए-बिल्डींग को.ऑ.हौ.सो.लि., ...............अपिलार्थी
आशा नगर, भाईंदर (पूर्व),
ठाणे ४०११०५.

जनमाहिती अधिकारी तथा,
विभागप्रमुख (वाहन) ................प्रतिवाद

## -: विवेचन :-

श्री.अशोक कुमार निगम यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (वाहन) यांचेकडे दि.०७/०४/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१. वाहन विभाग मे जो गाडिया ठेकेदार से लेकर प्रयोग की जा रही है उन सभी का चेचिस नम्बर, गाडी नम्बर तथा थाने आरटीओ से एप्रुवल से संबंधित दस्तावेज की सत्यापित जानकारी प्राप्त करने हेतु

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत माहिती दिली नसल्याने अपिलार्थी अर्जदार यांनी दि.०९/०७/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (वाहन) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (वाहन) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१३/०७/२०१८ रोजी दुपारी १२.४० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.वाहन/३२२/२०१८ दि.१६/०७/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (वाहन) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- मला दि.०७/०४/२०१८ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन देणेत आलेली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना योग्य ते शुल्क भरुन कागदपत्रांचे निरिक्षण करुन माहिती प्राप्त करुन घेणेबाबत दि.०२/०५/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (वाहन) यांनी अपिलार्थी अर्जदारास दि.०२/०५/२०१८ रोजीच्या पत्रान्वये माहितीचे निरिक्षण करुन माहिती प्राप्त करुन घेणेबाबत कळविले आहे. सबब, जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (वाहन) यांनी अभिलेखात जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती अपिलार्थी अर्जदारास १५ दिवसांत उपलब्ध करुन देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (वाहन)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.अशोक कुमार निगम,
ए/१०४, कृष्णलीला ए-बिल्डींग को.ऑ.हौ.सो.लि.,
आशा नगर, भाईंदर (पूर्व),
ठाणे ४०११०५.

२) जन माहिती अधिकारी तथा
विभागप्रमुख (वाहन)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (वाहन) यांचे कार्यालय.